– –

संं.फौ.खटला क्र. १५७९/२०२२.
सरकार वि. सोमेश्वर.
नि. क्र.०७ खाली .

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** - मुख्त्यार अहेमद दिदार चौहाण,

**वय** - ३९ वर्ष, **व्यवसाय** - मेकॅनीक काम,

**राहणार.-** राजगोपालचारी वार्ड, भंडारा, ता. व जिल्हा भंडारा.

**सरतपास– श्री.ए.सी.खुराना वकील यांच्यामार्फत.**

**१.** माझे भंडारा नागपुर रस्त्यावरती हेमंत सेलीब्रेशन हॉलच्या बाजुला गाडी दुरुस्तीचे दुकान आहे. दि.१८.०७.२०२२ रोजी एक डिझायर गाडी माझ्या दुकानात टोचन करुन दुरुस्तीसाठी आणली होती. तीचा अपघात झालेला होता. त्या गाडीच्या समोरच्या बंपरला आणि डाव्या बाजुच्या टायरला मार लागलेला होता. मी गाडी मालकाला त्याचा खर्च सांगुन गाडीची दुरुस्ती केली होती.

**२.** मी गाडी दुरुस्त केल्यानंतर पोलीसवाले चौकशीसाठी आले होते. मी दुरुस्त केलेली गाडी छत्तीसगढ राज्यातील होती. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन जबाब घेतला होता. मी पोलीसांना त्या गाडीचा क्रमांक चौकशी दरम्यान सांगितला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे –श्री. ए.बी.गभणे वकील यांच्यामार्फत.**

**३.** मला गाडी मालकाने गाडीचे चाक जंगली डुक्कराने फोडल्याचे सांगितले होते.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक – २४.०१.२०२४. (आर. पी. थोरे)

भंडारा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, भंडारा.